# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनाट क्रमांक ३१६-२२** **दिनांक १८/१०/२०२२**

## हात चलाखीने एटीएम कार्ड बदलुन वयोवृध्द व्यक्तींची आर्थिक फसवणूक करणा-या आरोपीतास अटक - मध्यवर्ती गुन्हे शाखेची कामगिरी.

दि. ०७/०५/२०२२ रोजी तक्रारदार श्री हरिदास राजाराम भानते हे काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतील एटीएम मशीन मधुन पैसे काढत असताना एका अज्ञात इसमाने त्यांचा एटीएम पिनकोड पाहुन त्यांचे एटीएम कार्ड हातचालखीने बदलुन तक्रारदार यांचे बँक खात्यामधुन ४ वेळा १०,०००/- रुपये असे एकुण ४०,०००/- रुपये एक्सीस बँकेचे एटीएम मशीनव्दारे काढुन फिर्यादी यांची फसवणुक केल्याने सदर अज्ञात इसमाविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणेत गु.रजि.नं. ३०५/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास मध्यवर्ती गुन्हे शाखा करीत असतांना घटनास्थळावरील तांत्रीक पुरावे प्राप्त करून गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहितीचे आधारे आरोपीचे ठावठिकाणाबाबत माहिती घेतली असता तो वाराणसी, उत्तर प्रदेश येथे असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यावरुन लागलीच एक तपास पथक वाराणसी, उत्तर प्रदेश येथे रवाना करून इसम नामे आफताब ऊर्फ रिकी इकलाख खान, वय ३६ वर्षे, रा. बंगला नं.४८, शिवनगर कॉलनी, चांदमारी लमही, ठाणा शिवपुर, वाराणसी, उत्तरप्रदेश याचा एसटीएफ वाराणसी उत्तर प्रदेश यांचे मदतीने शोध घेतला असता त्यास वाराणसी येथून ताब्यात घेतले आहे. त्याचे ताब्यातुन सदर गुन्हयात चोरीस गेलेले एस.बी.आय. बँकेचे एटीएम कार्ड तसेच इतर बँकेचे डेबिट व क्रेडिट कार्ड असे एकुण ४६ एटीएम कार्ड, रोख रक्कम व एक मोबाईल फोन असा एकुण ५०,०००/- रु किं.चा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच त्याचेकडे अधिक तपास करता त्याचे विरुध्द १) सहार पोलीस ठाणे, मुबंई गु.रजि.नं. I ३२६/२०१३ भा.द.वि.सं. कलम ३७९, ३४, व गु.रजि.नं. I २९७/२०१३ भा.द.वि.सं. कलम ३९२, २) मालवणी पोलीस ठाणे, मुंबई गु.रजि.नं. I १३१/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४२०, ३४, ३) अंधेरी एम.आय.डी.सी.पोलीस ठाणे, मुंबई गु.रजि.नं. I ७५/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४५२, ३५४, ३२४, व ४) लालगंज, प्रतापगड पोलीस ठाणे, उत्तर प्रदेश गु.रजि.नं. I २०७/२०१७ भा.द.वि.सं. कलम ३०७ येथे गुन्हा दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. अशा प्रकारे हातचलाखीने एटीएम कार्ड बदलुन आर्थिक फसवणूक करणा-या आरोपीस अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे शाखेस यश प्राप्त झाले आहे.

सदरची कामगिरी श्री विजयकांत सागर, पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय), अति.कार्यभार (गुन्हे) व श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. श्री राहुल राख, स.पो.नि. नितीन बेंद्रे, पो. अं. अनिल नागरे, जयकुमार राठोड, सुशिल पवार यांनी केलेली आहे.